F/c

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४८६ / ४८७

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

ई-मेल—desk१८@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

**संकेतस्थळ / रजिस्टर एडी/ई-मेल द्वारे**

क्र.१८/तंशिसं/एआयसीटीई-शिष्य/२०२३-२४/२४५
दिनांक : २० / १० / २०२३

प्रति,
सर्व संबंधित संस्थांचे प्राचार्य / संचालक,
( अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद मान्यताप्राप्त व्यावसायिक पदविका / पदवी अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्था )
महाराष्ट्र राज्य.

विषय :- **अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या प्रगती , सक्षम व स्वनाथ शिष्यवृत्ती योजनांची शै. वर्ष २०२३-२४ साठीच्या अंमलबजावणीबाबत....**

संदर्भ : अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे पत्र File No. ४९-१/StDC/ SAG Bureau /Sch. /Adv./Pragati & Saksham/२०२३-२४ -दि. ०५.१०.२०२३

उपरोक्त विषयांकीत संदर्भीय पत्रान्वये अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद मान्यताप्राप्त व्यावसायिक पदविका / पदवी अभ्यासक्रम चालविणाऱ्या सर्व संबंधित संस्थांचे प्राचार्य / संचालक यांना कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या **प्रगती , सक्षम व स्वनाथ शिष्यवृत्ती योजनांच्या** महाराष्ट्र राज्यामधील अंमलबजावणीकरिता **तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई** यांना नोडल ऑफिस म्हणून घोषित करण्यात आलेले आहे. सदर तिन्ही योजनांची माहिती खालीलप्रमाणे,

## अ ) प्रगती शिष्यवृत्ती योजना ::

[ AICTE-Pragati Scholarship Scheme for Students (Degree / Diploma)]

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेची मंजूरी असलेल्या संस्था व तांत्रिक अभ्यासक्रमांमध्ये (पदविका, पदवी ) शिकणाऱ्या **विद्यार्थीनीं साठी** प्रगती शिष्यवृत्ती योजना सुरु केलेली आहे. सदर योजनेकरीता **कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न (दोन्ही पालकांचे एकत्रित ) रुपये ८.०० लाखापर्यंत** असावे व एका कुटूंबातील **केवळ दोन मुलींना** सदर योजना लागू राहील.

सदर योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्यासाठी केंद्र शासनाकडून खालीलप्रमाणे शिष्यवृत्तीचा नविन संच **तसेच** नविन व नूतनीकरणाच्या शिष्यवृत्तीसाठी आलेल्या पात्र व मंजूर विद्यार्थ्यांला शिष्यवृत्तीची रक्कम खालील प्रमाणे निर्धारित करण्यात आलेली आहे.

- नविन संच / कोटा ( Quota ) :-

| राज्य | अ.क्र. | अभ्यासक्रम | संच संख्या |
|---|---|---|---|
| महाराष्ट्र | १ | पदविका | ६२४ |
| | २ | पदवी | ५५३ |

- **शिष्यवृत्ती रक्कम :-**

| **अ.क्र.** | **शिष्यवृत्तीचे घटक** | **एक रक्कम ( Lump sum Amount )** |
|---|---|---|
| अ | संस्थेला देय असणारे शुल्क, संगणक, स्टेशनरी, पुस्तके, यंत्रसामुग्री, सॉफ्टवेअर खरेदी इ. | **रु. ५०,०००/- प्रति वर्ष** |

## ब ) सक्षम शिष्यवृत्ती योजना ::

[ AICTE-Saksham Scholarship Scheme for Students (Degree / Diploma)]

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद मंजूरी प्राप्त संस्था व तांत्रिक अभ्यासक्रमांमध्ये ( पदविका, पदवी ) शिकणाऱ्या **विशेष दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी** सक्षम शिष्यवृत्ती योजना सुरु केलेली आहे. सदर योजनेकरीता **कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न (दोन्ही पालकांचे एकत्रित ) रुपये ८.०० लाखापर्यंत** व **दिव्यांगाचे प्रमाण ४०% किंवा त्यापेक्षा अधिक असावे** असे निश्चित करण्यात आलेले आहे.

सदर योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्यासाठी केंद्र शासनाकडून खालीलप्रमाणे शिष्यवृत्तीचा नविन संच **तसेच** नविन व नूतनीकरणाच्या शिष्यवृत्तीसाठी आलेल्या पात्र व मंजूर विद्यार्थ्यांला शिष्यवृत्तीची रक्कम खालील प्रमाणे निर्धारित करण्यात आलेली आहे.

- नविन संच / कोटा ( Quota ) :-

| राज्य | अ.क्र. | अभ्यासक्रम | संच संख्या |
|---|---|---|---|
| महाराष्ट्र | १ | पदविका | सर्व पात्र |
| | २ | पदवी | सर्व पात्र |

- **शिष्यवृत्ती रक्कम :-**

| **अ.क्र.** | **शिष्यवृत्तीचे घटक** | **एक रक्कम ( Lump sum Amount )** |
|---|---|---|
| ब | संस्थेला देय असणारे शुल्क, संगणक, स्टेशनरी, पुस्तके, यंत्रसामुग्री, सॉफ्टवेअर खरेदी इ. | **रु. ५०,०००/- प्रति वर्ष** |

## क ) स्वनाथ शिष्यवृत्ती योजना :

[ AICTE-Swanath Scholarship Scheme for Students (Degree / Diploma)]

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद्रेची मंजूरी असलेल्या संस्था व तांत्रिक अभ्यासक्रमांमध्ये ( पदविका,पदवी ) शिकणाऱ्या **अनाथ किंवा ज्या विद्यार्थ्याचे आई वडील दोघेही किंवा दोघांपैकी एक कोव्हिड-१९ ने मृत्यू पावले आहेत किंवा ज्या विद्यार्थ्यांचे पालक सशस्त्र दल आणि केंद्रीय निमलष्करी दलांच्या कारवाईमध्ये शहीद झाले आहेत** अशा विद्यार्थ्यांसाठी **स्वनाथ शिष्यवृत्ती** योजना सुरू केलेली आहे. सदर योजनेकरीता **कुटुंबाचे सर्व स्त्रोतांमार्फत मिळणारे वार्षिक उत्पन्न रुपये ८ लाखापर्यंत** निश्चित करण्यात आलेले आहे.

सदर योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून संपूर्ण देशासाठी खालीलप्रमाणे शिष्यवृत्तीचा नविन संच **तसेच** नविन व नूतनीकरणाच्या शिष्यवृत्तीसाठी आलेल्या पात्र व मंजूर विद्यार्थ्यांला शिष्यवृत्तीची रक्कम खालील प्रमाणे निर्धारित करण्यात आलेली आहे.

- **नविन संच/कोटा** (Quota)

| अ क्र. | अभ्यासक्रम | संपूर्ण देशासाठी संच संख्या |
|---|---|---|
| १ | पदविका | १००० |
| २ | पदवी | १००० |

- **शिष्यवृत्ती रक्कम**

| **अ.क्र.** | **शिष्यवृत्तीचे घटक** | **एक रक्कम ( Lump sum Amount )** |
|---|---|---|
| अ | संस्थेला देय असणारे शुल्क, संगणक, स्टेशनरी, पुस्तके, यंत्रसामुग्री, सॉफ्टवेअर खरेदी इ. | **रु.५०,०००/-** प्रति वर्ष |

उपरोक्त तिन्ही योजनेची सविस्तर माहिती व पात्रतेच्या अटी व शर्ती केंद्र शासनाच्या अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेचे संकेतस्थळावर ( संकेतस्थळ - www.aicte-india.org ) / केंद्र शासनाच्या **National Scholarship Portal ( NSP )** पोर्टल (संकेतस्थळ - www.scholarships.gov.in ) वर देण्यात आलेली आहे

सदर योजनेची मंजुर रक्कम केंद्र शासनाकडून थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये Direct Benefit Transfer ( DBT ) अंतर्गत जमा करण्यात येईल.

सदर योजना केंद्र शासनाच्या **National Scholarship Portal ( NSP )** पोर्टलद्वारे ( संकेतस्थळ - www.scholarships.gov.in ) ऑनलाईनरित्या राबविण्यात येतात. **शै. वर्ष २०२३-२४ करिता** सदर योजनेच्या लाभासाठी, प्रवेशित विद्यार्थ्यांनी **नवीन** ( Fresh ) अर्ज व **शै. वर्ष २०२२-२३ मध्ये शिष्यवृत्ती मंजूर झालेल्या पात्र** विद्यार्थ्यांनी **नूतनीकरण ( Renewal )** अर्ज भरतेवेळी, **विद्यार्थ्यांनी स्वत:च्या आधार क्रमांकाची नोंद करुन** ( जर आधार क्रमांक नसेल तर **आधार रजिस्ट्रेशन क्रमांकानुसार** ) NSP पोर्टलवर खालीलप्रमाणे जाहीर करण्यात आलेल्या अंतिम मुदतीच्या आत ऑनलाईनरित्या करावे ( अर्ज करण्यापूर्वी मार्गदर्शनासाठी विद्यार्थ्यांनी NSP पोर्टलवर सदर योजनेसाठी उपलब्ध User Manual / Guideline चा वापर करावा.)

तसेच, संस्थांनी NSP पोर्टलच्या लॉगीन आयडी व पासवर्डचा वापर करुन प्राप्त झालेले अर्ज प्रलंबित न ठेवता पोर्टलवर नमूद अंतिम मुदतीच्या आत ऑनलाईनरित्या तपासणी ( मंजूर / नामंजूर ) करावी.

| **विद्यार्थ्यांनी अर्ज भरण्याचे व संस्थेने अर्ज तपासणीचे वेळापत्रक :: शै. वर्ष २०२३-२४** | | |
|---|---|---|
| **अ.क्र.** | **कार्यवाही** | **अंतिम दिनांक** |
| १ | विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरणे. | ३१ डिसेंबर, २०२३ |
| २ | संस्थांनी ऑनलाईन अर्जाची तपासणी ( मंजूर / नामंजूर ) करणे | १५ जानेवारी, २०२४ |
| **टीप :: केंद्र शासनाकडून वेळापत्रकात काही बदल झाल्यास सदर बदल एनएसपी पोर्टलवर ( संकेतस्थळ - www.scholarships.gov.in ) जाहिर करण्यात येईल याची नोंद घ्यावी.** | | |

**महत्त्वाची सूचना-**

१. संस्थांनी एनएसपी पोर्टलवरील संबंधित योजनांसाठी असलेल्या लॉगीन आयडी व पासवर्डचा वापर करुन Institute Profile अद्ययावत करावी. तसेच **शै. वर्ष २०२३-२४ पासून संस्थेच्या एनएसपी पोर्टलवर नोंदणी असलेल्या, Head**

of Institute ( HOI ) व Institute Nodal Officer ( INO) यांचे Aadhaar Authentication अनिवार्य केलेले आहे. त्याबाबतचे अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेचे संकेतस्थळावर ( संकेतस्थळ - www.aicte-india.org) schemes /students-development-schemes/Pragati/General-Instructions अंतर्गत Head of Institute ( HOI ) व Institute Nodal Officer ( INO) Aadhaar Authentication बाबतचे Operating Manual देण्यात आलेले आहेत, **त्याचे अवलोकन करुन पुढील कार्यवाही करावी.**

२. संस्थांनी उपरोक्त योजनेबाबतची माहिती संस्थेच्या दर्शनी भागातील सूचना फलकावर लावावी व योजनेसाठी पात्र असलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांना योजनांबाबतची माहिती निदर्शनास आणून द्यावी व पात्र विद्यार्थ्याला अर्ज भरण्यासाठी आवश्यक सर्व सहकार्य करावे जेणेकरुन कोणताही पात्र विद्यार्थी योजनेच्या अर्ज भरण्यापासून वंचित राहाणार नाही.

३. विद्यार्थी केंद्र शासनाच्या ( NSP Portal ) व महाराष्ट्र शासनाच्या ( DBT Portal ) पोर्टलवरील शिष्यवृत्ती योजनांपैकी कोणत्याही एकाच योजनेचा लाभार्थी असेल याबाबत संस्था प्रमुखांनी स्वत: योग्य ती दक्षता घ्यावी.

४. संस्थेच्या लॉगीनमध्ये प्राप्त झालेले अर्ज जर तपासणीच्या अंतिम मुदतीनंतर संस्था स्तरावर तपासणीसाठी प्रलंबित राहील्यास **किंवा**

५. विद्यार्थ्याने एकाच वर्षाकरिता दोन - दोन शिष्यवृत्ती योजनांचा ( केंद्र व राज्य शासनाच्या अशा दोन्ही शिष्यवृत्ती योजनांचा ) लाभ प्राप्त करुन घेतल्यास **किंवा**

६. संस्थेमध्ये शिकत नसलेल्या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती अर्जास संस्थेकडून मंजूरी दिल्यास **किंवा**

७. संस्थेमध्ये TFWS अंतर्गत प्रवेशित असलेल्या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती अर्जास संस्थेकडून मंजूरी दिल्यास याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्था प्रमुखांची राहील याची नोंद घ्यावी.

( डॉ. विनोद म. मोहितकर )
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई.

---

पृष्ठांकन क्र. विकाछसं/शिक्षण/२०२३/ 3722
दिनांक:- 26 OCT 2023

या कार्यालयाच्या अधिनस्त सर्व मान्यताप्राप्त व्यावसायिक पदविका व पदवी अभ्यासक्रमाच्या चालविणाऱ्या सर्व संबंधित संस्थांना कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या प्रगती, सक्षम व स्वनाथ शिष्यवृत्ती योजनांची शै. वर्ष २०२३ - २४ साठीच्या अंमलबजावणीबाबत पत्रात नमूद माहिती व जाहिर वेळापत्रकानूसार न चुकता कार्यवाही पूर्ण करावी. पत्रात नमूद माहिती व जाहिर वेळापत्रक आपल्या संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे व केलेल्या कार्यवाही अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(उमेश नागदेवे)
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

प्रत :- १. मा. सहसंचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा., मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर
२. या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.